जनसंपर्क कक्ष (मुख्यमंत्री सचिवालय)

# मंत्रिमंडळ निर्णय

**दिनांक १० डिसेंबर, २०२५**

**(बैठक क्र.४७)**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र लोकआयुक्त अधिनियम, २०२३ मध्ये सुधारणा | सामान्य प्रशासन |

<u>सामान्य प्रशासन विभाग</u>

# महाराष्ट्र लोकआयुक्त अधिनियम, २०२३ मध्ये सुधारणा

महाराष्ट्र लोकआयुक्त अधिनियम, २०२३ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

महाराष्ट्रात लोकआयुक्त आणि उपलोकआयुक्त अधिनियम, १९७१ अस्तित्वात आहे. लोकआयुक्तांची नियुक्ती करून ही संकल्पना अस्तित्वात आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. केंद्र शासनाने सन २०१३ साली लोकपाल आणि लोकआयुक्त अधिनियम, २०१३ पारित केला. त्यानुसार महाराष्ट्रातही केंद्राच्या धर्तीवर नवा कायदा आणण्याबाबत मागणी केली गेली. त्यानुसार महाराष्ट्रातील लोकआयुक्त आणि उपलोकआयुक्त संस्था अधिक परिणामकारकरित्या काम कराव्यात, यासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या. या समित्यांनी शिफारस केल्यानुसार राज्याने महाराष्ट्र लोकआयुक्त अधिनियम, २०२३ तयार करून केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला. त्यावर केंद्राने अधिनियमाचे प्रारूप तपासून त्यातील कलम २ व कलम १२ यामध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार या अधिनियमात कलम २ (१)(च)(आठ) नंतर व कलम १२ मध्ये स्पष्टीकरणाचा समावेश करून सुधारणा करण्यात येणार आहे.

*****